**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : १०**

नगरसचिव कार्यालय

दिनांक :- १८/०२/२०२०

प्रति,

मा. ------------------------------------

स्थायी समिती, सदस्य

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची मा.स्थायी समिती **सभा क्र -१० सोमवार दि.२४/०२/२०२० रोजी दुपारी १.०० वा.** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृहात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

सही /-

प्र. नगरसचिव,

अहमदनगर महानगरपालिका

**सोमवार दिनांक - २४/०२/२०२० ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| १५० | मा.स्थायी समिती सभा क्र.०१ दिनांक २७/०६/२०१९, सभा क्र.०२ दिनांक १९/०८/२०१९, सभा क्र.३ दिनांक ०९/०९/२०१९ रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करणे. |
| १५१ | अर्जदार मालमत्ताधारक रजनी अरविंद निक्रड, रा. घर नं.८२/५०३ सावेडी हडको सावेडी,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र. ६३ , बिल नं.४८६ वरील नोंद मध्ये माजी सैनिकाची विधवा पत्नी असल्याने सन २०१६ पासून ते सन २०१९-२०२० अखेर घरपटटी रक्कम व शास्ती निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १५२ | अर्जदार गायकवाड कविता गुलाब (खंडागळे), रा. बागडे मळा बालिकाश्रम रोड, अ.नगर प्रभाग समिती क्र.१ मालमत्ता कर विभाग वॉर्ड क्र .४३ बिल क्र. ९३४/1 हे पाणीपटटीचे जादा देणारे बिल रू.९६६९/- + शास्ती निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १५३ | अर्जदार श्री.सुरेंद्र गिरधरदास परीख प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र.२० बिल क्र.२२२ सुरभी अपार्टमेंट येथील चुकीची झालेली मालमत्ता कराची आकारणी र्निलेखीत करणे बाबत चा ऑफिस रिपोर्ट . |
| १५४ | अर्जदार मालमत्ता धारक श्री भास्कर नारायण कुटे यांचे प्रभाग समिती क्र.१, सावेडी वॉर्ड क्रमांक ४३,बिल क्र.२९३ स.नं.२७६/७ ब लेंडकर मळा ,बालिकाश्रम रोड येथील ऑपन प्लॉटवर बांधकाम झाल्याने ओपन प्लॉटची घरपट्टीची आकारणी रद्दकरून त्यावरील आकारणीची रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १५५ | अर्जदार मालमत्ताधारक श्री. नेमीचंद धारू पवार, रा. बुरूडगाव रोड, अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र. २१ , बिल क्र.५५८ मालमत्तेची घरपटटी दुरूस्ती आकारणीची कमी रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १५६ | प्रभाग क्रमांक ८ मध्ये बोरूडेमळा येथील सिना नदीवर पुल बांधणेबाबतचा ऑफि रिपोर्ट महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७/३/ क नुसार केलेली अवलोकनार्थ कार्यवाहीस्तव. |

| | |
|---|---|
| १५७ | अहमदनगर महानगरपालिका "अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रक्कमेतून काम करणे" सन २०१९-२० ई - निविदा क्र.२१९२ या निविदेच्या मंजुरीबाबत अहमदनगर महानगरपालिका प्रभाग क्र.७ मधील श्री.म्हैसमाळे घर ते तोरणे घर ते सुनिल कलाप घर ते धनंजय विविध वस्तु भांडार ते भिंगारदिवे घरार्पत व केवाट घेर ते जगताप घर ते औटी घर ते गव्हाणे घरापर्यत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करून रस्त्याचे दुतर्फा पेव्हिंग ब्लॉक बसविणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १५८ | अहमदनगर महानगरपालिका "विकासभार निधी" सन २०१९-२० ई - निविदा क्रमांक २२२० या निविदेच्या मंजुरीबाबत अहमदनगर महानगरपालिका बोल्हेगांव गावठाण अंतर्गत जिल्हा परिषद शाळेसमोरील डी.पी.रस्त्याचे कडेने ६०० व ९०० एम.एम.व्यासाची बंद पाईप गटर करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १५९ | अहमदनगर महानगरपालिका कायम गणवेषपात्र पुरूष कर्मचा-यांना गणवेष कापड खरेदीकामी केलेल्या संविदची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये माहितीबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १६० | अहमदनगर महानगरपालिका रस्ताबाजु मांडणी फी व स्लॉटर फी वसुली ई -निविदा क्र.२१६४ व्यापारी लिफाफा छाननीबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १६१ | अहमदनगर महानगरपालिका पाणी बीलाची थकबाकी न भरल्याने ग्रामपंचायत यांचा बंद केलेला पाणी पुरवठा पुर्ववत / सुरू करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १६२ | अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने मा.न्यायालयामध्ये दाव्या संदर्भात कामकाज पहाणे करीता कायदेशीर सल्लागार (विधीतज्ञ) म्हणून ॲडव्होकेट याची दरमहा मानधनावर पॅनलवर नेमणुकीबाबतचा ऑफिस रिपोर्ट |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत- १]** विषय क्र. १५० :- मा.स्थायी समिती सभा क्र.०१ दिनांक २७/०६/२०१९, सभा क्र.०२ दिनांक १९/०८/२०१९, सभा क्र.३ दिनांक ०९/०९/२०१९ रोजीच्या सभेचे इतिवृत्ताची प्रत

**२]** विषय क्रमांक- १५१ ते १६२ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्र. १०**

विषय क्रमांक- १५०  सोमवार दि.२४/०२/२०२०

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्र.०१ दिनांक २७/०६/२०१९, सभा क्र.०२ दिनांक १९/०८/२०१९, सभा क्र.३ दिनांक ०९/०९/२०१९ रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर :-** मा.स्थायी समिती सभा क्र.०१ दिनांक २७/०६/२०१९, सभा क्र.०२ दिनांक १९/०८/२०१९, सभा क्र.३ दिनांक ०९/०९/२०१९ रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती सभेपुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मागील सभेचे इतिवृत्ताचे वाचन करा.

मागील सभा क्र. १, २ व ३ या सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करण्यात आले.

मा. गणेश भोसले - मागील सभेचे इतिवृत्त वाचन करा.

मागील सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- मागील सभेचे इतिवृत्त कायम करणे. इतिवृत्त कायम करण्यांत यावे.

मा.श्री. गणेश भोसले :- इतिवृत्त कायम करण्यात यावे.

मा.सौ. सोनाली चितळे :- इतिवृत्त कायम करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभा क्र.०१ दिनांक २७/०६/२०१९, सभा क्र.०२ दिनांक १९/०८/२०१९, सभा क्र.३ दिनांक ०९/०९/२०१९ रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करण्यांत येत आहे.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा क्र.०१ दिनांक २७/०६/२०१९, सभा क्र.०२ दिनांक १९/०८/२०१९, सभा क्र.३ दिनांक ०९/०९/२०१९ रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

सुचक :- मा.श्री. गणेश भोसले  सही /-

अनुमोदक :- मा.सौ. सोनाली चितळे  सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्र. १०**

विषय क्रमांक- १५१ सोमवार दि.२४/०२/२०२०

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार मालमत्ताधारक रजनी अरविंद निक्रड, रा. घर नं.८२/५०३ सावेडी हडको सावेडी,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र. ६३ , बिल नं.४८६ वरील नोंद मध्ये माजी सैनिकाची विधवा पत्नी असल्याने सन २०१६ पासून ते सन २०१९-२०२० अखेर घरपटटी रक्कम व शास्ती निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.१ सावेडी

घरपट्टी वसुली वॉर्ड क्र.६३ चे वसुली मदतनीस श्री.शिंदे सुरेश यांजकडून विनंती रिपोर्ट देण्यात येतो की,घरपट्टी वसुली वॉर्ड क्र.६३ बिल नं ४८६ वरील मालमत्ताधारक श्रीमती निक्रड रजनी अरविंद घर नं.८२/५०३ सावेडी हडको सावेडी यांनी दिनांक २४/०४/२०१८रोजी अर्ज देवून माजी सैनिकांच्या विधवांना त्यांच्या नावावर असलेल्या मालमत्ता करातुन सुट मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदार श्रीमती निक्रड यांनी सादर केलेंल्या अर्जावरील त्यांनी संरक्षण दलातील माजी सैनिकांच्या विधवांना मालमत्ता करातुन सुट देण्याबाबतचा महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण - २०१६ /प्र.क्र.५९/नवि -२० याबाबतचा शासन निर्णय जोडलेला असून सदरच्या शासन निर्णयामध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १२७ अन्वये माजी सैनिकांच्या विधवांना त्यांच्या नांवावर असलेल्या मालमत्तेच्या करातून सुट देण्यातबाबत शासन निर्णय झालेला आहे.

तरी श्रीमती निक्रड रजनी अरविंद यांनी अर्जासोबत जिल्हा सैनिक वेलफेअर यांनी दिलेल्या मालमत्ता करातुन सुट मिळणेबाबतच्या पात्रता प्रमाणपत्रानुसार श्रीमती निक्रड रजनी अरविंद या कै.अरविंद दत्तात्रय निक्रड या माजी सैनिकांच्या विधवा पत्नी असल्याचे प्रमाणपत्र दिलेले असून त्या मालमत्ता करात सुट मिळणेसाठी पात्र असल्याचे कळविले आहे.

तरी श्रीमती निक्रड रजनी अरविंद यां माजी सैनिक विधवा पत्नी असल्याने त्यांना महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण -२०१६ /प्र.क्र.५९/नवि -२० दि.७ एप्रिल २०१६ नुसार झेड १६३०६७४३१ या मालमत्तेच्या मालमत्ता करात सुट देणेबाबत अहवाल आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे वसुली मदतनीस यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,वसुली मदतनीस यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार मालमत्ताधारक श्रीमती निक्रड रजनी अरविंद या माजी सैनिक यांच्या विधवा पत्नी असून महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्र.संकिर्ण -२०१६ /प्र.क्र.५९/नवि -२० दि.७/४/१६ झेड १५००५२०४६ नुसार मालमत्ता करात सुट देणे उचित वाटते तथापी आदेशार्थ सादर.

यावर प्रभाग अधिकारी यांचाअभिप्राय की,शासन निर्णयानुसार वसुली लिपीक यांच्या प्रस्तावानुसार मालतत्ता करात सुट देणे उचित होईल.

यावर सहाय्यक मुल्य निर्धारण तथा करसंकलन आधिकारी यांचा अभिप्राय की,वॉर्ड क्र.६३ मधील वसुली लिपीक व करनिरीक्षक यांनी शासननिणृय नुसार सादर केलेला अहवाल व सादर केलेल्या कागदपत्रानुसार मालमत्ता करात सुट देणे उचित होईल.आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,कर निरिक्षक ,प्रभाग अधिकारी व सहाय्यक मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी यांनी प्रस्तावित केले प्रमाणे शासन निर्णय क्र.संकिर्ण -२०१६ /प्र.क्र.५९/नवि -२० दि.५/४/१६ मधील तरतुदीनुसार विभगाला उचित निर्णय घेता येईल.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,जिल्हा सैनिक कार्यालयाचे प्रमाणपत्र सक्षम प्राधिकारी यांचेकडून साक्षांकित करून घ्यावे शासन निर्णयानुसार दिनांकापासून मालमत्ता करामध्ये सुट देण्यात यावी.व जर थकबाकी असेल तर ती निर्लेखीत करणेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर सादर करून त्यास मान्यता घेणेत यावी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार मालमत्ताधारक रजनी अरविंद निक्रड, रा. घर नं.८२/५०३ सावेडी हडको सावेडी,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र. ६३ , बिल नं.४८६ वरील नोंद मध्ये माजी सैनिकाची विधवा पत्नी असल्याने सन २०१६ पासून ते सन २०१९-२०२० अखेर घरपटटी रक्कम व शास्ती निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट चे वाचन करण्यात आले.

मा.सौ.सोनाली चितळे:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावर तसेच विषय क्रमांक १५१ ते १५५ हे घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असून या विषयांना मान्यता देण्यात यावी.

मा.सौ.आशा कराळे :- विषय पत्रीकेतील विषय क्रमांक १५१ ते १५५ या विषयांना मान्यता देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अर्जदार मालमत्ताधारक रजनी अरविंद निक्रड, रा. घर नं.८२/५०३ सावेडी हडको सावेडी,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र. ६३ , बिल नं.४८६ वरील नोंद मध्ये माजी सैनिकाची विधवा पत्नी असल्याने त्यांना महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण -२०१६ /प्र.क्र.५९/नवि -२० दि.७ एप्रिल २०१६ नुसार सन २०१६ पासून ते सन २०१९-२०२० अखेर घरपटटी रक्कम व शास्ती निर्लेखित करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अर्जदार मालमत्ताधारक रजनी अरविंद निक्रड, रा. घर नं.८२/५०३ सावेडी हडको सावेडी,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र. ६३ , बिल नं.४८६ वरील नोंद मध्ये माजी सैनिकाची विधवा पत्नी असल्याने त्यांना महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण -२०१६ /प्र.क्र.५९/नवि -२० दि.७ एप्रिल २०१६ नुसार सन २०१६ पासून ते सन २०१९-२०२० अखेर घरपटटी मध्ये सुट देण्यात येणारी रक्कम निर्लेखित करणेस मान्यता देण्यात येत आहे. आणि शास्ती निर्लेखीत करण्याची बाब स्थायी समितीच्या कक्षेत नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ.सोनाली चितळे सही /-

अनुमोदक :- मा.सौ.आशा कराळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्र. १०**

विषय क्रमांक- १५२ सोमवार दि.२४/०२/२०२०

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार गायकवाड कविता गुलाब (खंडागळे), रा. बागडे मळा बालिकाश्रम रोड, अ.नगर प्रभाग समिती क्र.१ मालमत्ता कर विभाग वॉर्ड क्र .४३ बिल क्र. ९३४/१ हे पाणीपटटीचे जादा देणारे बिल रू.९६६९/- + शास्ती निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.१ सावेडी
वरील विषयान्वये वॉर्ड क्र.४३ चे वसुली लिपीक यांजकडून विनंती पुर्वक रिपोर्ट देण्यात येतो की,गायकवाड कविता गुलाब (खंडागळे) रा.बागडेमळा बालिकाश्रम रोड,अहमदनगर यासंनी इकडील कार्यालयास अर्ज देवून असे कळविले आहे की,आम्ही वरील ठिकाणी राहत असून आम्हाला मालमत्ता कराचे बील वॉर्ड क्र.४३बील क्र.९३४ (Z१४३०४५२८०) या क्रमांकाने बील येते त्यात पाणीपट्टी व सर्व कराचे बील येते.परंतु आमची सदर ठिकाणी एकच घर असून व एकच नळ असून आम्हाला दुसरी बील वॉर्ड क्र.४३ बील क्रमांक ९३४/१(Z१४३०४५२८१) हे दुसरे नळ कनेक्शन चे जादा बील येते तसेच वॉर्ड क्र.४३ बील क्र.२७५ (Z१४३०४४६०४) हे घनकच-याचे वेगळे बील येते.तसेच बील क्र.९३४/१ ला माझे माहेरचे नांव कविता गुलाब गायकावाड आहे.सदर बीलाला हे नांव येते तरी बील क्र.४३/९३४/१व बील क्र.४३/२७५ हे रद्द करून मिळावे.मालमत्ता कराचे बील क्रमांक ९३४ वरील संपुर्ण थकबाकीसह भरलेली आहे.

सदर अर्जदार यांच्या अर्जानुसार दिनांक २२/०८/२०१९ रोजी समक्ष जागेची स्थळ पाहणी तसेच संगणकीय प्रणालीची व तत्सम कागदपत्रांची पडताळणी केली असता.अर्जदार यांना मालमत्ता कराचे व पाणीपट्टी व इतर कराचे बील क्रमांक ९३४ नियमानुसार जात आहे. व ते त्यांनी दिनांक १९/८/२०१९ रोजी पावती क्रमांक AS/४३०८२ने रूपये १०,४८६/- इतके मनपात भरले आहे.पुर्वी घरपट्टी व पाणी पट्टी असे दोन विभाग होते.परंतु सन २००७-०८मध्ये दोन्ही विभाग एकत्र करण्यात आले होते.संगणकीय प्रणाली मध्ये पाणीपट्टी पुर्वीचे बील क्र.९३४/१ होते.सदर चे बील अर्जदार यांच्या माहेरच्या नावाने होते.तसेच अर्जदार यांनी बील क्र ४३/२७५ हे घनकचरा जादा बील जाते. तरी पाणीपट्टी जादा जाणारे बील क्रमांक ९३४/१ व घनकच-याचे जादा जाणारे बील क्रमांक ४३/२७५ हे दोन्ही बील रद्द करण्यास पुढील आदेशार्थ सविनय सादर.
येणे प्रमाणे वसुली लिपीक यांचा अहवाल असे.
यावर कर निरिक्षक सावेडी वसुली विभाग यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक यांची सादर केलेल्या प्रस्तावानुसार मालमत्ता धारक गायकवाड कविता गुलाब यांच्या मालमत्तेची नोंद मनपा अभिलेखात वॉर्ड् क्र४३ बि.क्र.९३४ यावर असून ते त्यानियमा प्रमाणे सर्व कर अदा करतात परंतु मालमत्ता धारक यांना त्याच मालमत्तेचे बिल क्र.९३४/१ व बि.क्र.२७५ रद्द करणे उचित वाटते तथापी आदेशार्थ सादर.

यावर प्रभाग अधिकारी प्र.स.क्र.१ यांचा अभिप्राय की,कर निरीक्षक यांचा अभिप्राय तसेच कागदपत्राची केलेली पाहणी व वसुली लिपीक यांच्या प्रस्तावानुसार दुबार बिले रद्द करणे उचित वाटते.
यावर सहाय्यक मुल्य निर्धारण तथा करसंकलन आधिकारी यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केल्यानुसार जना मा.क्र.९३४ व घरपट्टी व पाणीपट्टीचे एकत्रित कराचे बिल येत आहे व ९३४/१ वर निव्वळ पाणीपट्टीचे बिल येत आहे.सन २०१२/१३ या वर्षात मायनेट कंपनीचे संगणीकीय आकारणीचे कामकाज सुरू झाले आहे.त्यावेळेस ऑब्लीकचे बिल जनरेशन ॲटोचालु झाल्यामुळे जु.मा.क्र.९३४/१ ने सुरू झाले आहे.घरपट्टी मध्ये पाणीपट्टीचे बिल येत असल्याने जु.मा.क्र.९३४/१ हे रद्द करणे आवश्यक आहे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,रद्द करावयाच्या दोन बिलांची रक्कम नमुद करून ती निर्लेखीत करणेसाठी मा.आयुक्त यांचे मान्यतेने प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेसाठी सादर करावा व मान्यतेनंतर सदरची बिले रद्द करावी.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,सदर बिलाची रक्कम सन २०१९-२० अखेर एकुण रूपये ९२६९/+ शास्ती इतकी मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्रायकी शास्ती किती ?

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय कि,फेरसादर,मा.आयुक्तसाहेब यांच्या दिनांक २१/०९/२०१९ रोजीच्या आदेशानुसार सदर बिलाची रक्कम रू.५२२०/- व २%शास्तीची सप्टेंबर अखेर रक्कम रू ४४४९/- एकुण रू.९६६९/- आहे.आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार गायकवाड कविता गुलाब (खंडागळे), रा. बागडे मळा बालिकाश्रम रोड, अ.नगर प्रभाग समिती क्र.१ मालमत्ता कर विभाग वॉर्ड क्र .४३ बिल क्र. ९३४/१ हे पाणीपटटीचे जादा देणारे बिल रू.९६६९/- + शास्ती निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट चे वाचन करण्यात आले.

मा.सौ.आशा कराळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावर तसेच विषय क्रमांक १५१ ते १५५ हे घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असून या विषयांना मान्यता देण्यात यावी.

मा.सौ.सोनाली चितळे :- विषय पत्रीकेतील विषय क्रमांक १५१ ते १५५ या विषयांना मान्यता देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अर्जदार गायकवाड कविता गुलाब (खंडागळे), रा. बागडे मळा बालिकाश्रम रोड, अ.नगर प्रभाग समिती क्र.१ मालमत्ता कर विभाग वॉर्ड क्र .४३ बिल क्र. ९३४/१ हे पाणीपटटीचे जादा देणारे बिल रू.९६६९/- निर्लेखित करणेस मान्यता देण्यात येत आहे. आणि शास्ती निर्लेखीत करण्याची बाब स्थायी समितीच्या कक्षेत नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

**ठराव :-** अर्जदार गायकवाड कविता गुलाब (खंडागळे), रा. बागडे मळा बालिकाश्रम रोड, अ.नगर प्रभाग समिती क्र.१ मालमत्ता कर विभाग वॉर्ड क्र .४३ बिल क्र. ९३४/१ हे पाणीपटटीचे जादा देणारे बिल रू.९६६९/- निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. आणि शास्ती निर्लेखीत करण्याची बाब स्थायी समितीच्या कक्षेत नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ.आशा कराळे सही /-

अनुमोदक :- मा.सौ.सोनाली चितळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्र. १०**

विषय क्रमांक- १५३ सोमवार दि.२४/०२/२०२०

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री.सुरेंद्र गिरधरदास परीख प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र.२० बिल क्र.२२२ सुरभी अपार्टमेंट येथील चुकीची झालेली मालमत्ता कराची आकारणी निंलेखीत करणे बाबत चा ऑफिस रिपोर्ट

.**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४बुरूडगांव

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की,श्री.सुरेंद्र गिरधरदास पारीख यांनी दि.२९/४/१४ रोजी अर्ज सादर केलेला आहे.सदर अर्जामध्ये आपले ता.८/४/१४ चे बिल नं ३१९६१ चे आज ता.२९/४/१४ रोजी मिळाले.वॉनं.२० झोन नं.४ मधील गिरधर अपार्ट मेंट मधील सदर बिल माझे नावाने आले आहे.सदर अपार्ट मेंटमध्ये गेल्या १० वर्षापासून माझा काहीही संबंध नाही.येथे इतर रहिवासी राहतात.त्यांचे फ्लॅट आहेत.माझे नावाने काही एक फ्लॅट वगैरे नाहीत.तरी आपल्या कराच्या रजिस्टरमधून माझे नांवने बिल नं.३१९६१ चे रूपये २८,८९६/- करमुक्त (टॅक्स ) कमी करावा.असा अर्ज सादर केलेला आहे.

याबाबत वास्तविक परिस्थिती अशी की,वॉर्ड क्र.२० बिल क्र.२२२ मालमत्ता क्र.Z४२०१०३४३९ श्री.सुरेंद्र गिरधरदास पारेख या नावाने मालमत्ता कराची आकारणी करण्यात आलेली आहे.सदर मिळकतीवर सन २०१९-२० अखेर मालमत्ता कराची रू.७१७१८/- इतकी थकबाकी आहे.

सन २००४-०५ या आर्थिक वर्षामध्ये "सुरभी अपार्टमेंट " मधील फ्लॅट क्र.१ ते ९ वर फ्लॅट प्रमाणे मालमत्ता कराची आकारणी करण्यात आलेली आहे.मात्र बिल क्र.२२२ वर आकरणी करतांना तळ मजला आर.सी.सी.राहणे व जिना पार्कीग १९.५२ चौ.मी.वर मालमत्ता कराची आकारणी करण्यात आलेली आहे.सध्या सुरभी अपार्टमेंटमध्ये तळ मजल्यावर फक्त पार्किग असुन कोणतेही आर.सी.सी.बांधकाम अस्तित्वात नाही.

त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातीमधील कलम १५२ नुसार रू.७१७१८/- इतकी रक्कम निर्लेखित करणेस,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण ८ "कराधान नियम" कलम ५१ नुसार शास्ती कराची रक्कम रू.७१७१८/- इतकी कमी करणेस व कोणत्याही स्वरूपाचे बांधकाम नसल्याने सदरचे बिल क्र.२१६ हे कायम स्वरूपी कमी करणेस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांची स्वाक्षरी

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक,कर निरीक्षक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर सहाय्यक मुल्य निर्धारण तथा करसंकलन आधिकारी यांचा अभिप्राय की,विभागाने प्रस्तावित केल्यानुसार अपार्टमेंटची नविन आकारणी करतांना पार्किगची समाईक क्षेत्राची स्वतंत्र कराची आकारणी केलेली आहे.त्यावेळेस स्टोअरचे क्षेत्र दर्शवुन कर आकारणी केलेली आहे.

कर निरीक्षक यांनी पहाणी अहवालानुसार पार्किगच्या जागेत कोणतेही बांधकाम नाही व पार्किग खुली सुटल्याने अपार्टमेंटच्या पार्किगचे क्षेत्र विभागुन प्रत्येक सदनिकेत एकुण सदनिकांची आकारणी झालेली आहे.त्यामुळे पार्किग क्षेत्राची आकारणी डबल झालेली आहे.ते रद्द करणे आवश्यक आहे.त्यासाठी बिलरद्द करण्यासाठी बिलावर असणारा मालमत्ता कर निर्लेखित करणेसाठी सदर प्रस्ताव स्थायी समिती कडे पाठविणे विषयी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,* मध्ये नमुद केलेली वस्तुस्थिती आहे,त्याबाबत अर्जदारांनी T-१ पी A मध्ये नमुद केलेली वस्तुस्थिती असून याबाबत वसूली विभागाच्या कर्मचा-यांकडून अर्जदारांना बिल पाठविले जात आहे.त्यामुळे T-१ वर B मध्ये नमुद केलेनुसारची रक्कम + वसूल होवू शकत नसल्यामुळे सदरची रक्कम निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समितीकडे पाठविणेकामी निर्णयार्थ सादर.

यावर मा.आयुक्त तथा जिल्हाधिकारी यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री.सुरेंद्र गिरधरदास परीख प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र.२० बिल क्र.२२२ सुरभी अपार्टमेंट येथील चुकीची झालेली मालमत्ता कराची आकारणी र्निलेखीत करणे बाबत चा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट चे वाचन करण्यात आले.

मा.सौ.आशा कराळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावर तसेच विषय क्रमांक १५१ ते १५५ हे घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असून या विषयांना मान्यता देण्यात यावी.

मा.सौ.सोनाली चितळे :- विषय पत्रीकेतील विषय क्रमांक १५१ ते १५५ या विषयांना मान्यता देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री.सुरेंद्र गिरधरदास परीख प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र.२० बिल क्र.२२२ सुरभी अपार्टमेंट येथील चुकीची झालेली मालमत्ता कराची आकारणी र्निलेखीत करणे बाबतच्या ऑफिस रिपोर्टास मान्यता देण्यात येत आहे.आणि शास्ती निर्लेखीत करण्याची बाब स्थायी समितीच्या कक्षेत नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>** अर्जदार श्री.सुरेंद्र गिरधरदास परीख प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र.२० बिल क्र.२२२ सुरभी अपार्टमेंट येथील चुकीची झालेली मालमत्ता कराची आकारणी र्निलेखीत करणे बाबत चा ऑफिस रिपोर्टास मान्यता देण्यात येत आहे.आणि शास्ती निर्लेखीत करण्याची बाब स्थायी समितीच्या कक्षेत नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ.आशा कराळे सही /-

अनुमोदक :- मा.सौ.सोनाली चितळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्र. १०**

विषय क्रमांक- १५४ सोमवार दि.२४/०२/२०२०

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार मालमत्ता धारक श्री भास्कर नारायण कुटे यांचे प्रभाग समिती क्र.१, सावेडी वॉर्ड क्रमांक ४३,बिल क्र.२९३ स.नं.२७६/७ ब लेंडकर मळा ,बालिकाश्रम रोड येथील ऑपन प्लॉटवर बांधकाम झाल्याने ओपन प्लॉटची घरपट्टीची आकारणी रद्दकरून त्यावरील आकारणीची रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

.**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.१ सावेडी

वरील संदर्भिय विषयान्वये वॉर्ड क्र.४३चे वसुली लिपीक यांजकडून विनंती पुर्वक रिपोर्ट देण्यात येतो की,वॉर्ड क्र.४३ बिल क्र.१०४२ चे मालमत्ताधारक श्री.भास्कर नारायण कुटे रा.स.न२७६/७ ब ,लेंडकर मळा ,बालिकाश्रम रोड, अहमदनगर यांनी इकडील कार्यालयास अर्ज देवून असे कळविले अहे की,आमचा वरील सर्व्हे नंबरवर ओपन प्लॉट होता.व त्या प्जॉटमध्ये आम्ही आमच्या राहत्या घराचे बांधकाम केले सदर बांधकाम आम्ही सन २००४ मध्ये केले हेते.व त्या मबांधकामास सन २००४ मध्ये आपल्या कार्यालयाने मालमत्ता कर आकारणी देखील केली व ती आम्ही दरवर्षी इमानेइतबारे भरतो .सदर बांधकामास मालमत्ता कर आकारणी केली तेव्हा सदर मालमत्तोस वॉर्ड क्र.४३/१०४२ हा ठेवून ओपन प्लाटचा बिल नंबर ४३/२९३ हा रद्द करून मिळावा. अशा स्वरूपाची अर्जदार यांनी मागणी केली आहे.

सदर अर्जदार यांच्या अर्जानुसार तत्सम कागदपत्राची व संगणकीय कर अप्रणालीची तपासणी केली असता बिल क्रमांक ४३/२९३ हे ओपन प्लॉटचे बिल असून बिल क्रमुंक ४३/१०४२ हे बिल मालमत्ताधारकांच्या राहत्या घराचे असून मालमत्ताधारकांनी बिल क्रमांक ४३/२९३ या ओपन प्लाटच्या बिलावरच बांधकाम केलेले असून तत्कालीन वसुली लिपीक यांनी सदर बांधकामास बिल क्रमांक ४३/२९३ हा नंबर दयायला पाहिजे होता.परंतु सदरचा बिल नंबर तसाच ठेवून नविन बिल नंबर ४३/१०४२ हा दिला.त्यामुळे मालमत्ताधारकास एकाच जागेचे दोन बिले जातात बिल नंबर ४३/१०४ हा नंबर ठेवून बिल क्रमांक ४३/२९३ हा रद्द करण्यास पुढील आदेशार्थ रिपार्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार मालमत्ता धारक श्री.भास्कर नारायण कुटे यांच्या आपन भुखंडास सन २००४ रोजी मनपा मार्फत कर आकारणी करण्यात आली.त्या वेळी सदर भुखंडाची नोंद वॉर्ड क्र.४३/२९३ यावर होती परंतु बांधकामाची आकारणी करतांना सदर मालमत्तेस नविन बिल क्र.१०४२ देण्यात आला असल्याने एकाच मालमत्तेची दोन बिले मालमत्ताधारक यांना देण्यात येत आहे.बि.क्र.२९३ व बिल क्र.१०४२ हया एकच मालमत्ता असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसुची (३) प्रकरण ८ कराधान नियम १५२ अन्वये बिल क्र.२९३ थकबाकीसह निर्लेखित करणे उचित वाटते तथापी आदेशार्थ.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,कर निरीक्षक यांचा अभिप्रय व मालमत्ता कराची आकारणी रहिवास दराने सन २००४ पासून करण्यात आल्याने ओपन भुखंडावर झालेली आकारणी सन २००४ पासून कमी करणेबाबत मा.स्थायी समिती समोर ठेवणे उचित वाटते.

यावर सहाय्यक मूल्य निर्धारक कर संकलन अधिकारी यांचा अभिप्राय की,विभागाने प्रस्तावित केल्यानुसार जु.मा.क्र.२९३ वर ओपन प्लॉटची नोंद असतांना तत्कालीन कर्मचारी यांनी ओपन प्लॅटच्या नोंदीची खात्री न करता नविन मा.क्र.टाकुण इमारती आकारणी टाकलेली आहे.त्यामुळे एकाच मालमत्ताच्या नावाने ओपन प्लॅट व इमारतीची कर येत आहे.सदयस्थितीत ओपन प्लॉटचा कराचा भरणा संबंधीत मालमत्ताधारक भरत नसल्याने रक्कम वसुल होणारी नाही.त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ नुसार स्थायी समितीच्या मान्यतेने कर निर्लेखित करणेस सादर प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणे विषयी आदेशार्थ सादर.यावर मा.उपायुक्त (कर ) यांचा अभिप्राय की, सहाय्यक मूल्य निर्धारक कर संकलन अधिकारी यांचे अभिप्रायानुसार २००४ पासून कमी करावयाची (निर्लेखित करावयाची रक्कम ) किती आहे याची माहिती देवून उपरोक्त Anुसार प्रस्ताव सादर करावा.

यावर सहा.मूल्य निर्धारक कर संकलन अधिकारी यांचा अभिप्राय की,जु.मा.क्र.९३४/१हे रद्द करणे आवश्यक आहे.

यावर मा.उपायुक्त (कर)यांचा अभिप्राय की,रद्द करावयाच्या दोन बिलांची रक्कम नमद करून ती निर्लेखित करणेसाठी मा.आयुक्त यांचे मान्यतेने प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेसाठी सादर करावा व मान्यतेनंतर सदरची बिले रद्द करावी.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,सदर बिलाची रक्कम सन २०१९-२० अखेर एकुण रूपये ९२६९+ शास्ती इतकी मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,शास्ती किती ?

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्रायक की,मा.आयुक्त साहेब यांच्या दि.२१/०९/२०१९ रोजीच्या आदेशानुसार सदर बिलाची रक्कम रू.५२२०/- व २% शास्ती ची सप्टेंबर अखेर रक्कम रू.४४४९ /- एकुण रक्कम रू.९६६९/- आहे आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,स्थायी समिती मध्ये ठेवा.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार मालमत्ता धारक श्री भास्कर नारायण कुटे यांचे प्रभाग समिती क्र.१, सावेडी वॉर्ड क्रमांक ४३,बिल क्र.२९३ स.नं.२७६/७ ब लेंडकर मळा ,बालिकाश्रम रोड येथील ऑपन प्लॉटवर बांधकाम झाल्याने ओपन प्लॉटची घरपट्टीची आकारणी रद्दकरून त्यावरील आकारणीची रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.गणेश भोसले :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट चे वाचन करण्यात आले.

मा.सौ.आशा कराळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावर तसेच विषय क्रमांक १५१ ते १५५ हे घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असून या विषयांना मान्यता देण्यात यावी.

मा.सौ.सोनाली चितळे :- विषय पत्रीकेतील विषय क्रमांक १५१ ते १५५ या विषयांना मान्यता देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अर्जदार मालमत्ता धारक श्री भास्कर नारायण कुटे यांचे प्रभाग समिती क्र.१, सावेडी वॉर्ड क्रमांक ४३,बिल क्र.२९३ स.नं.२७६/७ ब लेंडकर मळा ,बालिकाश्रम रोड येथील ऑपन प्लॉटवर बांधकाम झाल्याने ओपन प्लॉटची घरपट्टीची आकारणी रद्दकरून त्यावरील आकारणीची रक्कम निर्लेखित करणेस मान्यता देण्यात येत आहे.आणि शास्ती निर्लेखीत करण्याची बाब स्थायी समितीच्या कक्षेत नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

**ठराव :-** अर्जदार मालमत्ता धारक श्री भास्कर नारायण कुटे यांचे प्रभाग समिती क्र.१, सावेडी वॉर्ड क्रमांक ४३,बिल क्र.२९३ स.नं.२७६/७ ब लेंडकर मळा ,बालिकाश्रम रोड येथील ऑपन प्लॉटवर बांधकाम झाल्याने ओपन प्लॉटची घरपट्टीची आकारणी रद्दकरून त्यावरील आकारणीची रक्कम निर्लेखित करणेस मान्यता देण्यात येत आहे.आणि शास्ती निर्लेखीत करण्याची बाब स्थायी समितीच्या कक्षेत नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ.आशा कराळे सही /-

अनुमोदक :- मा.सौ.सोनाली चितळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्र. १०**

विषय क्रमांक- १५५ सोमवार दि.२४/०२/२०२०

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार मालमत्ताधारक श्री. नेमीचंद धारू पवार, रा. बुरूडगाव रोड, अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र. २१ , बिल क्र.५५८ मालमत्तेची घरपटटी दुरूस्ती आकारणीची कमी रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

.**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४ बुरूडगांव

प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड नं.२१ चे वसुली लिपीक यांजकडून विनंती रिपोर्ट देण्यात येतो की,वॉर्ड नं.२१ मधिल मालमत्ता धारक श्री.नेमीचंद धारू पवार यांनी संदर्भानुसार इकडील कार्यालयाकडे अर्ज दाखल करून कळविले आहे.

मालमत्ताधारक अर्जदार यांनी दाखल केलल्या अर्जानुसार दि.१३/३/२०१८ रोजी समक्ष स्थळ पहाणी केली असता तसेच वसुली अभिलेखा पडताळणी केली असता सन २०००/२००१ चे परिशिष्ट अ फॉर्मवर एकुण क्षेत्रामध्ये ओपन पॅसेज क्षेत्र दर्शविणेत येवून सदर ओपन पॅसेज क्षेत्र कर आकारणी करिता घेण्यात आलेले आहे.बेरीज चुकीचे दर्शविण्यात आलेली आहे.तसेच ६/७मिळकतीचे कर योग्यमुल्य काढणेबाबत नमुना यावर एकुण क्षेत्र ६६.४६०चुकीचे दर्शविण्यात आलेले आहे.त्यामुळे सदर मिळकतीवर चुकीचे आकारणी सन २०००/२००१ चे परिशिष्ट अ फॉर्म वरील क्षेत्रफळ बेरीज तपासणी केली असता ओपन पॅसेज वगळून दुरूस्ती नुसार एकुण क्षेत्र ५८.१० असुन त्यानुसार कर आकारणी सोबतच्या तक्त्यात दर्शविणेत आलेली आहे.

तथापि महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल प्रकरण ३० कलम ४८५(१) अन्वये सदर पहाणी व वसुली तत्सम अभिलेखा पडताळणी नुसार दुरूस्त क्षेत्र ५८.१० प्रमाणे चुकीची दुरूस्ती सन १९९५ ते २०१८ अखेर करण्यास अहवाल मान्यतेस्तव आदेशार्थ सविनय सादर.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक /करनिरीक्षक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर सहाय्यक मूल्य निर्धारक कर संकलन अधिकारी यांचा अभिप्राय की, वॉर्ड क्र.२१ मधील वसुली लिपीक व करनिरीक्षक यांनी सादर केलेल्या प्रस्ताव प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय व सादर केलेली कागदपत्रे नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ४८५(१) नुसार दुरूस्ती करणे उचित वाटते.आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,पृष्ठ क्र.३ वरील नावाबाबत खात्री करणे विलंबाबाबत खुलाश्यासह फेरसादर करणे पृ ३ .४/ प वरील थकबाकी भरणा करून सादर करावे.

यावर करनिरीक्षक यांचा अभिप्राय की,फेरसादर,प्रस्तुत प्रकरणी मा.मुलेप यांनी दि.१६/५/२०१९नुसार आदेशीत के ल्या प्रमाणे पृ.क्र.३ वरील नावाबाबत मालमत्ता धारक यांनी दाखल केलेल्या अर्जानुसार व वसुली अभिलेखा पडताळी केली असता वॉर्ड क्र.२१ बिल क्र५५८ श्री.नेमीचंद धारू पवार या नांवाने नांदे आहे.

उक्त मालमत्ता धारक यांच्या प्रकरणी यापुर्वी वॉ.क्र.२१ करीता कोण लिपीक काम पहात होते याचा उदबोध होत नाही.

मालमत्ता धारक यांनी दाखल केलेल्या अर्जानुसार मिळकतीचे मंजूरी नुसार जो पर्यत दुरूस्ती होणार नाही तो पर्यत दूरूस्ती नुसार एकरकमी कराचा भरणा करणार नाही असे मालमत्ता धारक यांनी इकडील कार्यालयात समक्ष चर्चा अंती सांगीतले

तथापी माहिती फेरसादर सविनय सादर.

यावर प्रभाग अधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मु.ले.प यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केल्याप्रमाणे ओपन स्पेस बाबत सविस्तर खुलासा सादर करावा.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,प्रस्तुत प्रकरणी मुलेप यांनी दिनांक ३१/५/२०१८ आदेशीत केलेप्रामाणे उक्त प्रकरणांकामी दिनांक १६/५/२०१८ टि-२ नुसार फेरसादर केलेले आहे.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक यांच्या प्रस्तावानुसार अ प्रमाणे कार्यवाही करणे उचित होईल तसेच फेरसादर केल्या प्रमाणे टि-२ प्रमाणे थकबाकी वसुली करून कार्यवाही करणेसाठी निर्णय आपले स्तरावर घेणे योग्य वाटते.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित अ प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) टि -१ वरील अ प्रमाणे क्षेत्र दुरूस्त करून सुधारित आकरणी करावी त्यानुसार एकुण किती आकारणी होते (थकबाकी + चालू) याचा रकमेसहित अहवाल सदर करावा व पूर्वीची एकुण मागणी व सुधारीत मागणी यामधील फरकाची रक्कम निर्लेखित करणेसाठीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे निर्लेखित करणेसाठीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीत निर्णयानंतर पुढील कार्यवाही करावी.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की, टि-१ अ मधिल अ प्रमाणे सुधारीत आकारणी करयोग्य मुल्यानुसार ऐकुण थकबाकी ७२७८४/- ऐवढी निघत आहे.तसेच पुर्वीची मागणी ७१८८/- हि महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ मधिल कलम १५२ अन्वये निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समिती मान्यतेसाठी सादर करणेस आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, अ नुसार मा.स्थायी समितीकडे रक्कम रू.७१८८/- निर्लेखित करणेसाठी मान्यता मिळणेकामी पाठविणेस हरकत नाही दरम्यानच्या कालावधीत थकबाकी करून घेवून सुधारिता बिल अर्जादाराला देणेस दूरूस्ती मान्यता मिळणेकामी सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अर्जदार मालमत्ताधारक श्री. नेमीचंद धारू पवार, रा. बुरूडगाव रोड, अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र. २१ , बिल क्र.५५८ मालमत्तेची घरपटटी दुरूस्ती आकारणीची कमी रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.गणेश भोसले :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट चे वाचन करण्यात आले.

मा.सौ.आशा कराळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावर तसेच विषय क्रमांक १५१ ते १५५ हे घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असून या विषयांना मान्यता देण्यात यावी.

मा.सौ.सोनाली चितळे :- विषय पत्रीकेतील विषय क्रमांक १५१ ते १५५ या विषयांना मान्यता देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अर्जदार मालमत्ताधारक श्री. नेमीचंद धारू पवार, रा. बुरूडगाव रोड, अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र. २१ , बिल क्र.५५८ मालमत्तेची घरपटटी दुरूस्ती आकारणीची कमी रक्कम निर्लेखित करणेस मान्यता देण्यात येत आहे.आणि शास्ती निर्लेखीत करण्याची बाब स्थायी समितीच्या कक्षेत नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>** अर्जदार मालमत्ताधारक श्री. नेमीचंद धारू पवार, रा. बुरूडगाव रोड, अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र. २१ , बिल क्र.५५८ मालमत्तेची घरपटटी दुरूस्ती आकारणीची कमी रक्कम निर्लेखित करणेस मान्यता देण्यात येत आहे.आणि शास्ती निर्लेखीत करण्याची बाब स्थायी समितीच्या कक्षेत नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ.आशा कराळे सही /-

अनुमोदक :- मा.सौ.सोनाली चितळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्र. १०**

विषय क्रमांक- १५६ सोमवार दि.२४/०२/२०२०

**प्रस्तावाचा विषय :-** प्रभाग क्रमांक ८ मध्ये बोरूडेमळा येथील सिना नदीवर पुल बांधणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७/३/ क नुसार केलेली अवलोकनार्थ कार्यवाहीस्तव.

.**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

संदर्भ- मा.नगरसेविका सौ. पुष्पा अनिल बोरूडे , यांची दिनांक ८/११/२०१९ ची यादी

कळविण्यांत येते की, दिनांक २०/७/२०१९ पासून पुढील दरम्यानच्या काळात शहरात मोठया प्रमाणात पाउस झाल्याने मोठया प्रमाणात नुकसान झाले दरम्यान प्रभाग क्रमांक- ८मधील बोरूडेमळा येथील सिना नदीवरील पुल पाण्याच्या प्रवाहामुळे वाहुन गेला आहे. सदर बाबत तसेच सदर भागातील नगरसेविका यांचे समावेत सदर भागातील नगारिकांनी मा.आयुक्त साहेबांना समक्ष निवेदन दिलेले आहे.

सदरच्या पुलावरून बोरूडेमळा व परिसरातील नागरिकांची शेतजमीनी नदीच्या बाजुने असल्याने नदी पात्र ओलाडून जावे लागते. या पुलावरून शेतकरी आपल्या मालाची वाहतुक तसेच मोठया प्रमाणात नागरिका ये-जा करण्यासाठीही या पुलाचा वापर करत होते.सदर पुल पावसाच्या प्रेशरने भिंत पडुन पाईप वाहुन गेलेला आहे. हा पुल वाहुन गेल्यामुळे शेतक-यांना आपल्या मालाची वाहतुक करणे अडचणीचे येत आहे. तसेच सदर पुलावरून एक ते दीड हजार नागरिकांचा जाण्या-येणा-चा रस्ता बंद झाल्याने त्यांना दुर अंतरावरून जावे लागते.सदर भागात जाण्याकरीता एकमेव हयाच पुलाचा पर्याय आहे. त्यामुळे सदर भागातील शेतक-यांना दररोज आपल्या शे्तीवर जाण्याकरीता सध्या गैरसोय होत आहे. त्यामुळे सदर भागातील शेतक-यांना दररोज आपल्या शेतीवर जाण्याकरीता सध्या गैरसोय होत आहे. त्यामुळे सदरचा पुल तातडीने बांधकाम करणे गरजेचे आहे. याबाबत मा.आयुक्त साहेब यांनी तातडीने काम करणे बाबत आदेश दिलेले आहेत.

त्यानुसार सदर भागातील नगरसेविका सौ. पुष्पा अनिल बोरूडे व सदर भागातील इतर नागरिकांनी सदरचा पुल तातडीने बांधकाम करणेबाबत सुचिवले आहे. सदर कामाचे समक्ष पहाणी करून रक्कम रूपये ९,८४,२७१/-चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७/३/क नुसार उदभवलेल्या आपत्कालीन परिस्थितीतून बाहेर पडणेकामी त्वरीत करावे लागणार असल्याने मा.आयुक्त अधिकारात महानगरपालिकेचे नियमीत ठेकेदार श्री. सुनिल रामराव राउत ,अ.नगर (ठेकेदार नोंदणी केली, कामाची यादी ,GST,ERF नोंदणी व निविदा दराने काम करण्यास तयार असलेबाबत संमतीपत्र इ. सोबत जोडले आहे.)

वरील रिपोर्ट अवलोकनार्थ तथा सोबतच्या मसुदयाप्रमाणे महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७/३/क नुसार ठेकेदार श्री. सुनिल रामराव राउत ,अ.नगर यांचे होणारे कामाचे मोजमाप घेवुन व म.जि.प्रा.चे. सन २०१८-२०१९ चे दरसुचीचे दर वापरून निविदा दराने काम करून घेणेस व सदरचा खर्च अंतर्गत सुधारणा (बांधकाम परवानगी) सन २०१९-२० या लेखाशिर्षकात नोंदविणेस सादर. सदर लेखाशिर्षका अंतर्गत सन २०१९-२० करीता रू.१०० लक्ष इतकी तरतुद केलेली आहे. आजपर्यत रक्कम रूपये ४९,८४,३७७/- खर्च झ ाालेला आहे व रू.५०,१५,६२३/- रक्कम शिल्लक आहे. सदरचे काम करणे तातडीचे असल्याने जरी ५०% निधी नोंदविण्यात आला असला तरी ही सदरचे काम तातडीचे असल्याने करावे लागणार आहे.,

महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७/३/क नुसार श्री. सुनिल रामराव राउत,अ.नगर यांचेकडून काम करून घेण्यास व प्रस्ताव अवलोकनार्थ मा.स्थायी समितीकडे पाठविणेस प्रस्ताव मान्यतेस्तव तथा आदेश होणेस सादर./अ

येणेप्रमाणे उपअभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा. शहर अभियंता यांचा अभिप्राय की, मा.सादर उपअभियंता यांचे वरील अहवालानुसार पुढील कार्यवाहीस आदेशार्थ सादर.

यावर मा.मुख्यलेखाअधिकारी यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, उपअभियंता व शहर अभियंता यांच्या अभिप्रायानुसार वरील 'अ' मान्यतेस्तव सादर सार्व. बांधकाम विभाग शासन निर्णय दि.२७/९/२०१८ परिच्छेद २.२.१ मधील तरतुदीतील बांधकाम विभागाने खात्री करून "अ" बाबत मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "अ" मध्ये प्रस्तावीत केल्यानुसार व मुलेप यांच्या अभिप्रायानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, तातडीचे काम आहे मोठया लोकसंख्यांचा शहरात येणारा मार्ग बंद झाला आहे म्हणून सदर काम तातडीने करणे आवश्यक आहे सबब सदर कामास मनपा अधिनियम कलम ६७/३/क नुसार मान्यता देण्यात येते.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- बोरूडेमळा येथील सिना नदीवर पुल बांधणेबाबतचा ऑफि रिपोर्ट महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७/३/ क नुसार केलेली अवलोकनार्थ कार्यवाहीस्तव. प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट चे सभागृहामध्ये वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- सविस्तर माहिती विभाग प्रमुखांनी सभागृहास दयावी.

प्र.शहरअभियंता श्री.इथापे :- बोरूडे मळा येथील सिना नदीवरील पुल जुना झाल्याने नागरीकांची जाण्यायेण्याची अडचण होत होती.या करीता बोरूडे मळा येथे पुल बांधणे गरजेचे होते.

मा.श्री.गणेश भोसले :- ऑफिस रिपोर्ट नुसार अवलोकन झाले .

मा.श्री.गणेश भोसले :- ठेकेदाराकडून वसुली नसल्याने महानगरपालिकेचे अंदाजे १५ ते १८ लाख रूपयांचे नुकसान झाले आहे.तसेच महानगरपालिकेच्या कर्मचा-यांचे वेतन,पावतीपुस्तक खर्च याचा विचार करता , तसेच तीन वेळा निविदा प्रसिध्द करूनही त्यास प्रतिसाद मिळत नसल्याने मे.वंशीका एंटरप्राईजेस,अ.नगर यांची निविदा मंजूर करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- खाजगी जागेवर बाजार भरविल्यास त्याची वसुली होते का? न झाल्यास वसुल होण्या करीता ठेकेदार संस्थेस प्रशासना मार्फत कारवाई करण्यात येते का ?

मार्केट विभाग प्रमुख श्री.वखारे :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३३१(२ ) आहे.कोणत्याही खाजगी व्यक्तीला खाजगी बाजार किंवा खाजगी कत्तलखाना उघडता येत नाही.जर उघडायचा असेल तर त्या करीता मा.आयुक्त यांची पुर्व परवानगी लागते.त्याव्यक्तीचे मालकी हक्कचे कागदपत्र पाहून परवानगी दिली जाते.सध्या जो बाजार सुरू आहे त्याला आपण परवानगी दिलेली नाही.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये खाजगी जागेमध्ये बाजार भरविलेला असल्यास फी वसुली करण्यात यावी. वसुली करणे करीता काही अडथळे आल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३३१(२)नुसार मार्केट विभाग व प्रभाग समित्या यांनी कार्यवाही करण्यात यावी.

मा.सौ.सोनाली चितळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.वसुली करीता काही अडचण आल्यास ठेकेदार संस्थेस सहकार्य करून कायदेशीर कारवाई करावी.

मा.श्री.गणेश भोसले :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा. महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये खाजगी जागेमध्ये बाजार भरविलेला असल्यास रस्ता बाजु फी वसुली करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका रस्ताबाजु मांडणी फी व स्लॉटर फी वसुली करीता ई -निविदा क्र.२१६४ मधील मे.वंशीका एंटरप्राईजेस,अ.नगर यांच्या रू.२४,०१,०००/- या जादा देकाराच्या रक्कमेच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे. महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये खाजगी जागेमध्ये बाजार भरविलेला असल्यास फी वसुल करण्यास मान्यता देण्यात येत आहे. शहर हद्दीमध्ये रस्ताबाजु मांडणी फी व स्लॉटर फी वसुली करणे करीता काही अडथळे आल्यास मार्केट विभाग व प्रभाग समित्या यांनी योग्यती कार्यवाही करावी.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिका रस्ताबाजु मांडणी फी व स्लॉटर फी वसुली करीता ई -निविदा क्र.२१६४ मधील मे.वंशीका एंटरप्राईजेस,अ.नगर यांच्या रू.२४,०१,०००/- या जादा देकाराच्या रक्कमेच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे. महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये खाजगी जागेमध्ये बाजार भरविलेला असल्यास फी वसुल करण्यास मान्यता देण्यात येत आहे. शहर हद्दीमध्ये रस्ताबाजु मांडणी फी व स्लॉटर फी वसुली करणे करीता काही अडथळे आल्यास मार्केट विभाग व प्रभाग समित्या यांनी योग्यती कार्यवाही करावी.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.सोनाली चितळे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.गणेश भोसले सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही नाही
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्र. १०**

विषय क्रमांक- १६१ सोमवार दि.२४/०२/२०२०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी बीलाची थकबाकी न भरल्याने ग्रामपंचायत यांचा बंद केलेला पाणी पुरवठा पुर्ववत / सुरू करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

.**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग.

**संदर्भ :-** ग्रामपंचायत कार्यालय विळद ता.नगर जिल्हा अहमदनगर यांचा दिनांक १०/०२/२०२० अन्वये पत्र.

उपरोक्त विषया बाबत विनंती पुर्वक प्रस्ताव सादर करण्यात येतो की,ग्रामपंचायत शिंगवेनाईक,ग्रामपंचायत देहरे व ग्रामपंचायत विळद गवळीवाडा या तीन ग्रामपंचायतीचा पाणी पुरवठा थकबाकीची रक्कम न भरल्याने दि.७/२/२०२० रोजी खंडीत करण्यात आलेला असल्योन संदर्भिय पत्रानुसार सरपंच ग्रामपंचायत विळद गवळीवाडा तालुका ज्नगर,जिल्हा -अहमदनगर यांनी पाणी पुरवठा सुरे करणे बाबत इकडेस विनंती केलेली आहे.

तसेच महानगरपालिकेमार्फत ग्रामपंचायतींना पाणी पुरवठा केला जात असून त्यांचेकडे माहे डिसेंबर २०१९ अखेर थकबाकीचा गोषवारा खालील प्रमाणे

थकीत पाणीपट्टीधारक ग्रामपंचायती अनुक्रमे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | ग्रामपंचायतीचे नांव | पाणीपट्टीची रक्कम (मुद्दल) | व्याजाची रक्कम | एकुण थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत शिंगवेनाईक (पाणी पुरवठा चालू) | २१,४०,४१६/- | २५,०४,१५४/- | ४६,४४,५७०/- |
| २ | ग्रामपंचायत देहरे (पाणी पुरवठा चालू) | ४६,१४,७९२/- | १,६५,२४,६७९/- | २,११,३९,४७१/- |
| ३ | ग्रामपंचायत विळद, गवळीवाडा (पाणी पुरवठा चालू) | १५,८९,४२४/- | ३६,२०,१९९/- | ५२,०९,६२३/- |
| पाणी पुरवठा बंद असलेल्या ग्रामपंचायत | | | | |
| ४ | ग्रामपंचायत वरवंडी व इतर ५ गावे ता.राहुरी | ४,०३,१७,०००/- | ३८,०५,१०,३१०/- | ४२,०८,२७,३१०/- |
| ५ | ग्रामपंचायत खारेकजुने | ८२,७६,४००/- | ३,६२,७५,३४१/- | ४,४५,५१,७४१/- |
| ६ | ग्रामपंचायत शेंडी पोखर्डी | ४४,४५,८३९/- | १,६६,६९,११८/- | २,११,१४,९५७/- |
| ७ | ग्रामपंचायत हिंगणगांव | ४२,५७,०००/- | ४,४८,२७,६८१/- | ४,९०,८४,६८१/- |
| ८ | ग्रामपंचायत नागरदेवळे | ४०,३९,१५/- | २०,२६,५१४/- | २४,३०,४२९/- |
| ९ | ग्रामपंचायत बु-हाणनगर | ५०,३०,६०६/- | १,६१,७९,११२/- | २,१२,०९,७१८/- |
| १० | ग्रामपंचायत बुरूडगांव | २३५१० | ० | २३५१० |
| | एकुण | ७,१०,९८,९०२/- | ५१,९१,३७,१०८/- | ५९,०२,३६,०१०/- |

वरील ग्रामपंचायतीस अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजने अंतर्गत मुळानगर ते वसंतटेकडी दरम्यान कार्यरत मुख्य जलवाहिनीसह तेथील साठवण टाकीमधून तत्कालीन नगरपरिषदेकडे पाणी योजना हस्तांतरीत होणे (सन १९९९) पूर्वी पासून नियमीत पाणी पुरवठा करण्यांत येतो.पाणी पुरवठा करणेपोटी संबंधीत ग्रामपंचायतींना दि.१/७/९९ पासून महानगरपालिकेकडून दरमहा नियमीत पाणी पुरवठ्याचे बिल देण्यात येत आहे.परंतु ग्रामपंचायतीने कोणतेही सबळ कारण अथवा पुर्व कल्पना न देता दरमहाची बील भरण्याचे जाणीवपूर्वक टाळाटाळ करीत असल्याने त्यांचेकडे थकबाकीची रक्कमेत दिवसेंदिवस वाढ होत आहे.

सदर थकबाकी भरणा करणे ग्रामपंचायतींना वेळोवेळी नोटिसा,अंतिम नोटिसा देण्यात आलेले आहेत.वेळप्रसंगी ज्या ग्रामपंचायतींना पाणी पुरवठा केला जातो त्यांचा पाणी पुरवठा खंडीत करण्यात आलेला आहे.परंतु अदयाप पर्यत एकाही ग्रामपंचायतीने नियमितपणे पाणी बिलाची रक्कम भरणा करीत नाही.वेळ प्रसंगी तात्पुरत्या रकमेचा भरणा करून खंडीत पाणी पुरवठा चालू केला जातो.परंतु थकबाकी भरणे बाबत कोणताही ठोस उपाययोजना अथवा खात्री दिली जात नाही.यामुळे थकबाकीच्या रकमेत वाढ होत असून त्यावर व्याजाची आकारणी होत आहे.भविष्यात व्याजाच्या रकमेत वाद निर्माण होवू शकतो.

या करीता ठोस खालील प्रमाणे उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक असून सदरच्या ग्रामपंचायती या महापालिकेकडून पाणी घेवून ग्रामपंचायती मार्फत वाढीव दराने गावातील नागरीकांना पाणी पुरवठा करतात व दरमहा किंवा वार्षिक पाणी पट्टीची रक्कमेचा भरण महापालिकेत करीत नाहीत.

१.ज्या ग्रामपंचायती खंडीत पाणी पुरवठा सुरू करणे बाबत विनंती अर्ज करतील त्यांचे कडून नियमती पाणी बिलाचे देयके दरमहा भरण्यात येईल तसेच थकबाकीच्या रक्कमेपोटी ठराविक रक्कमही दरमहा अदा केली जाईल याची खात्री अथवा लेखी हमी घेण्यात यावी.त्याशिवाय त्यांचा पाणी पुरवठा सुरू करू नये.तसेच पाणी पुरवठा सुरू करतांना २५ टक्के रक्कम भरून घेण्यात यावी.

२.ज्या ग्रामपंचायतींचा पाणी पुरवठा खंडीत केलेला आहे,परंतु त्यांनी अदयापर्यत पाणी पुरवठा सुरू करणे बाबत विनंती केलेली नाही व आज अखेर त्यांचा पाणी पुरवठा खंडीत असल्याने त्यांच्या थकबाकी व व्याजाच्या रकमेत वाढ होत असल्याने थकबाकी वसुलीसाठी ग्रामपंचायत नावावर असलेल्या जमिनीचे मालमत्ताचे उतारे मिळणे बाबत सर्व ग्रामपंचायत,कामगार तलाठी ,गटविकास अधिकारी ,मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद,अ.नगर यांना देखील पत्र देण्यात आलेले आहे.परंतु प्रतिसाद मिळालेला नाही.तसेच त्यांचे मालमत्ता मधून कायदेशीर बाबी तपासून थकबाकी वसुल करणे योग्य वाटते.

३. वरिल सर्व ग्रामपंचायतीची थकबाकीची रक्कम वसुल होत नसल्याने मा.मुख्यकार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,हे मनपाच्या नोटीसांना,पत्रांना प्रतिसाद देत नसल्याने सदरची थकबाकीची रक्कम वसुल होणेकामी मा.शासनास पत्रव्यवहार करून मा.मुख्यकार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद अहमदनगर यांना मिळणा-या अनुदानातुन परस्पर कपात करणे करून मनपाकडे वर्ग करणे बाबत मा.प्रधान सचिव,ग्राम विकास विभाग ,मुंबई यांना विनंती पत्र पाठविणे उचित वाटते.

वरील तक्त्यात नमुद सर्व ग्रामपंचायतीच्या थकबाकीसाठी अशी ठोस उपाययोजना करणे बाबत आपले स्तराव उचित होणेस आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे लिपीक ,पाणीपुरवठा विभाग यांचा अहवाल असे.

यावर पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांची स्वाक्षरी

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,थकबाकी रकमे पैकी २५ टक्के रक्क्म भरल्यांनतर पाणीपुरवठा चालू करणे उचित होईल तसेच ज्या ग्रामपंचायती यांचा या पुर्वी पाणीपुरवठा बंद करण्यात आलेला आहे व चालू करण्यासाठी मागणी करत नाही व थकीत पाणीपट्टीचा भरणत करत नाही व नोटीसा दिल्यानंतर त्यास

प्रतिसाद देत नाही त्या बाबत मा.शासनास पत्रव्यवहार करून त्यांना मिळणा-या अनुदानातुन परस्पर कपात करण्यात मा.शासनास मागणी करण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.जिल्हाधीरकारी तथा आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,मान्य तथापी सदर मुदयांवर स्थायी समितीनी सुध्दा चर्चा करावी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--- *** ---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका पाणी बीलाची थकबाकी न भरल्याने ग्रामपंचायत यांचा बंद केलेला पाणी पुरवठा पुर्ववत / सुरू करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट चे वाचन करण्यात आले.

मा.श्री.सुभाष लोंढे :- कोणकोणत्या ग्रामपंचायतींकडे पाणीपट्टीची थकबाकी आहे.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.काकडे :- शिंगवे नाईक,देहरे,विळदगवळीवाडा या तीन ग्रामपंचायतींना पाणी पुरवठा चालू आहे.वरवंडी व इतर पाच गांवे ता.राहुरी ,खारेकर्जुने,शिंडी पोखर्डी ,हिंगणगांव ,नागरदेवळे , बु-हाणनगर व बुरूडगांव अशा एकुण सात ग्रामपंचायतीचा पाणी पुरवठा बंद करण्यात आलेला आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- कधी पासूनची थकबाकी आहे.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.काकडे :- सन १९९९ पासुन थकबाकी आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- या सर्व ग्रामपंचायतींकडे किती थकबाकी आहे.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.काकडे :- ग्रामपंचायतींकडे पाणीपट्टीची रक्कम ७ कोटी १० लाख व व्याज ५१ कोटी ९१ लाख  असे एकुण रूपये ५९ कोटी रक्कम थकीत आहे.

मा.श्री.सुभाष लोंढे  :- या सर्व ग्रामपंचायतीची थकबाकीची रक्कम वसुल होणेकामी मा.शासनास पत्रव्यवहार करून मा.मुख्यकार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद अहमदनगर यांना मिळणा-या अनुदानातुन परस्पर कपात करणे करून मनपाकडे वर्ग करणे बाबत मा.प्रधान सचिव,ग्राम विकास विभाग ,मुंबई यांना विनंती पत्र देण्यात यावे.

मा.श्री.गणेश भोसले :- या सर्व ग्रामपंचायतीची थकबाकीची रक्कम वसुल होणेकामी त्यांच्या कडे असलेल्या थकबाकीतील एक मागील वार्षीक बिल व चालू आर्थिक वर्षातील  एक बील यानुसार वसुलीची कार्यवाही करण्यात यावी.

मा.सौ.सोनाली चितळे :- खुप मोठया प्रमाणात थकबाकी आहे.महानगरपालिकेच्या थकबाकीला कोणतीही संस्था सोडत नाही.महानगरपालिकेची आर्थिक परिस्थीती सुध्द खुप वाईट आहे.नागरीकांची कोणतेही कामे होत नाहीत.लाईट बिलाची रक्कम थकल्यास लाईट कट करण्याची कारवाई केली जाते. या ग्रामपंचायतींचा पाणी पुरवठा सुरू करतांना २५ टक्के रक्कम भरून घेण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- या सर्व ग्रामपंचायतीची थकबाकीची रक्कम वसुल होणेकामी त्यांच्या कडे असलेल्या थकबाकीतील एक मागील वार्षीक बिल व चालू आर्थिक वर्षातील  एक बील यानुसार वसुलीची कार्यवाही करण्यात यावी.अन्यथा ग्रामपंचायतींना   मिळणा-या अनुदानातुन परस्पर कपात करणे करून मनपाकडे वर्ग करणे बाबत मा.प्रधान सचिव,ग्राम विकास विभागास पत्रव्यवहार करण्यात यावा. या ग्रामपंचायतींचा पाणी पुरवठा सुरू करतांना २५ टक्के रक्कम भरून घेण्यात यावी.ग्रामपंचायतींच्या मालकीच्या स्थावर मालमत्तेच्या उता-यावर महानगरपालिकेच्या थकबाकी रकमेचा बोजा चढविण्यात यावा.यासारख्या ठोस उपाययोजना करण्यात याव्यात.

**<u>ठराव :-</u>**अहमदनगर महानगरपालिका पाणी बीलाची थकबाकी न भरल्याने ग्रामपंचायतीची थकबाकीची रक्कम वसुल होणेकामी ग्रामपंचायतीं कडे असलेल्या थकबाकीतील एक वार्षीच्या बिलाची रक्कम व चालू आर्थिक वर्षातील बीलाची रक्कम एकरकमी वसूल करावी.यानुसार वसुलीची कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.याबाबत रक्कमअदा केली जाईल याची खात्री अथवा लेखी हमी घेण्यात यावी.अन्यथा ग्रामपंचायतींना मिळणा-या अनुदानातुन परस्पर कपात करून मनपाकडे वर्ग करणे बाबत मा.प्रधान सचिव,ग्राम विकास विभागास पत्रव्यवहार करण्यात यावा.ग्रामपंचायतींच्या मालकीच्या स्थावर मालमत्तेच्या उता-यावर महानगरपालिकेच्या थकबाकी रकमेचा बोजा चढविण्यात यावा.यासारख्या ठोस उपाययोजना करण्यात याव्यात.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.सोनाली चितळे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.गणेश भोसले सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्र. १०**

विषय क्रमांक- १६२ सोमवार दि.२४/०२/२०२०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने मा.न्यायालयामध्ये दाव्या संदर्भात कामकाज पहाणे करीता कायदेशीर सल्लागार (विधीतज्ञ) म्हणून ॲडव्होकेट याची दरमहा मानधनावर पॅनलवर नेमणुकीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ- १. ॲड. सुमित भरत भोज, २. ॲड. गौरव अशोक भोसले, ३. ॲड. प्रसन्ना एम. जोशी , ४. ॲड. अभिषेक विजय भगत, ५. ॲड. संतोष त्र्यंबक जोशी , ६. ॲड. धैर्यशिल लक्ष्मणराव वाडेकर, ७. प्रसाद दिलीप गांगर्डे यांचे अर्ज

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, १] ॲड. सुमित भरत भोज, रा. आदिशक्ती , दातरंगे मळा, नालेगाव अहमदनगर ,२] ॲड. गौरव अशोक भोसले, घ.नं.२६८९ गंजबाजार, धर्मवीर जगदीश भोसले चौक,अहमदनगर, ३] ॲड. प्रसन्ना एम. जोशी , न्यु कराचीवाला नगर, तारकपुर,एस.टी.स्टॅण्ड मागे, राधाबाई काळे महिला महाविदयालयाजवळ,अहमदनगर, ४] ॲड. अभिषेक विजय भगत, चेंबर नं.३०६,तिसरा मजला, जिल्हा न्यायालय कंपौउड, अहमदनगर , ५] ॲड. संतोष त्र्यंबक जोशी , त्रिंबकराज अवधुत लेन, रासनेनगर, सावेडी, अहमदनगर, ६] ॲड. धैर्यशिल लक्ष्मणराव वाडेकर,साईदंब पोस्ट कॉलनी कोहिनूर मंगल कार्यालयापुढे , एकवीरा चौक, अहमदनगर तसेच ७] प्रसाद दिलीप गांगर्डे , अहमदनगर यंनी मा.सभापती स्थायी समिती अहमदनगर महानगरपालिका यांचेकडे अर्ज देवुन अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने मा. जिल्हा न्यायालयामध्ये कामकाज पहाणे करीता पॅनलशिप मानधनावर ॲडव्होकेट (विधीतज्ञ) कायदेशीयर म्हणून नियुक्ती होणेबाबत विनंती केलेली आहे. सदर अर्जावर मा.सभापती स्थायी समिती यांनी याबाबत सविस्तर प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर करणेबाबत निर्देशित केलेले आहे.

अहमदनगर महानगरपलिकेमार्फत मा.न्यायालयामधील दाव्या संदर्भत कामकाम पहाणे करीता कायदेशीर सल्लागार (विधीतज्ञ) म्हणून सद्यस्थितीमध्ये खालील प्रमाणे ॲडव्होकेट यांची दरमहा मानधनावर नियुक्ती असुन माहिती बाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | नांव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणुक व दि. | कालावधी | दरमहा मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | ॲड. श्री. एस.के.पाटील | विधीतज्ञ | कोर्ट विभाग जा.क्र.४६४ दि.१३/०८/२००३ आस्था. विभाग जा.क्र.४९५४ दि.९/११/२०१६ | दि.१३/८/२००३पासुन पुढील आदेश होईपर्यत (मा.औद्यो. व कामगार न्याया.) | १२,०००/- मा.स्था.स.ठ.नं.८५ दि.३/९/२०१६अन्वये दि.१५/११/२०१६ मानधनात वाढ दरमहा रू.१७०००/- |
| २ | ॲड. श्री. एस.बेंद्रे | विधीतज्ञ | आस्था.जा.क्र.७२८२ दि.१६/१/२०१५ | दि.१६/१/२०१५पासून पुढील आदेश होईपर्यत (मा.उच्च न्याया.औरं.बाद) | २०,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | ॲड. श्री.किशोर एन. लोखंडे | विधीतज्ञ | आस्था. जा.क्र.३०७२ दि.३०/७/२०१४ | दि.१/८/२०१४ पासून पुढील आदेश होईपर्यंत (मा.उच्च न्याया.औरं.बाद) | २०,०००/- |
| ४ | ॲड. तुळशीराम एकनाथ बाबर | विधीतज्ञ | आस्था.जा.क्र.३०७४ दि.३०/७/२०१४ | दि.१/८/२०१४ पासून पुढील आदेश होईपर्यंत (मा.दिवाणी / फौजदारी ) | मा.स्था.स.ठ.नं.८५ दि.३/९/२०१६अन्वये पुनश्च : नियुक्ती १०,०००/- |
| ५ | ॲड. शशिकांत बी. रकटे | विधीतज्ञ | आस्था. जा.क्र.४९५३ दि.०९/११/२०१६ | दि.१५/११/२०१६पासून पुढील आदेश होईपर्यंत (मा.दिवाणी / फौजदारी ) | १०,०००/- |
| ६ | ॲड. मंगेश व्ही. दिवाण | विधीतज्ञ | आस्था.जा.क्र.४९५३ दि.९/११/२०१६ | दि.१५/११/२०१६पासून पुढील आदेश होईपर्यंत (मा.दिवाणी / फौजदारी ) | १०,०००/- |
| ७ | ॲड. राहुल एम.पवार | विधीतज्ञ | आस्था.जा.क्र.४९५३ दि.०९/११/२०१६ | दि.१५/११/२०१६पासून पुढील आदेश होईपर्यंत (मा.दिवाणी / फौजदारी ) | १०,०००/- |
| ९ | ॲड. सौरभ सुभाष काकडे | विधीतज्ञ | आस्था.जा.क्र.४९५३ दि.०९/११/२०१६ | दि.१५/११/२०१६पासून पुढील आदेश होईपर्यंत (मा.दिवाणी / फौजदारी ) | १०,०००/- |
| १० | ॲड. आर.डी.येनंगदुल | विधीतज्ञ | आस्था.जा.क्र.४९५३ दि.०९/११/२०१६ | दि.१५/११/२०१६पासून पुढील आदेश होईपर्यंत (मा.दिवाणी / फौजदारी ) | १०,०००/- |
| ११ | ॲड. निलेश विजयकुमार देशमुख | विधीतज्ञ | आस्था.जा.क्र.४९५३ दि.०९/११/२०१६ | दि.१५/११/२०१६पासून पुढील आदेश होईपर्यंत (मा.दिवाणी / फौजदारी ) | १०,०००/- |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

५३ :- नेमणुकीचा अधिकार कोणामध्ये निहीत असणे.

(१) महानगरपालिकेच्या जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे- मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकामध्ये निहीत असेल:

परंतु आयुक्ताला महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्या ही अस्थायी नेमणूक सहा महिन्याहून अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणूक करताना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणूकीचे नवीकरण करता येणार नाही.

(२) पोट- कलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त , नगरपालिका मुख्य लेखापरिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी - मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत- यांची नेमणूक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधीन, यथास्थिति, नगरपालिका मुख्य लेखापरिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहीत असेल. मात्र , कोणत्याही विशिष्ट प्रकरणात किंवा प्रकरणाच्या वर्गात अश मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यरिरिक्त , नगरपालिका अधिकारी व कर्मचारी- मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत- यांची नेमणूक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहीत असेल.

परंतु कायम नेमणूकांच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल.

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरी नेमणूक सहा महिन्यांहून अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि लिपिक या पदाशी समतुल्या असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहून अधिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणूकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही असे नमुद केलेले आहे.

संबंधीतांच्या विनंती अर्जाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या पॅनलवर कायदेशीर सल्लागार (विधीतज्ञ ) ॲडव्होकेट म्हणून दरमहा मानधनावर नेमणूक करणे बाबत निर्णय झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ (३) नुसार सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पुर्व मंजुरी करीता निर्णयास्तव पाठविणेस व त्याप्रमाणे मा.स्थायी समितीच्या ठरावाच्या अनुषंगाने सदर प्रस्तावास मंजुरी मिळाल्यानंतर वर्तमान पत्रामध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या दाव्या संदर्भात मा.न्यायालयामध्ये कामकाज पहाणेसाठी नव्याने विधीतज्ञ (ॲडव्होकेट) यांची दरमहा मानधनावर नियुक्ती करीता मुलाखतीसाठी थेट पध्दतीने (Walk In Interview) नुसार जाहिरात प्रसिध्दीस द्यावी लागेल.

तदनंतर सदर प्रसिध्द जाहिरातीलच्या अनुषंगाने मा. निवड समिती मार्फत उमेदवारांच्या थेट पध्दतीने मुलाखती घेवुन निवड झालेल्या ॲडव्होकेट यांची यादी नोटीस फलकावर प्रसिध्द करून त्याप्रमाणे निवड झालेल्या ॲडव्होकेट यांची नव्याने दरमहा मानधनावर पुढील आदेश होईपर्यत नियुक्ती आदेश निर्गमित करावा लागेल व त्याच वेळेस यापुर्वी कार्यरत विधीतज्ञ पैकी दरमहा मानधनावरील केलेल्या यापुर्वीच्या नियुक्ती संपुष्टात येत असल्या बाबत आदेश संबंधितांना निर्गमित करावा लागेल. सदरची वरील विहीत पध्दतीची प्रक्रिया ही एकाच वेळेस होणे तांत्रिक दृष्टया योग्य होईल.

.उपरोक्त प्रकरणी आर्थिक व धोरणात्मक बाब असल्याने याबाबत मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन याबाबत निर्णय होणे उचित वाटते.

तरी उपरोक्त संबंधीतांच्या अर्जाच्या अनुषंगाने व सदरच्या अर्जावर मा.सभापती स्थायी समिती यांनी सुचित केल्यानुसार सदर प्रकरणी अहमदनगर महानगरपालिकेमध्ये नव्याने (विधीतज्ञ) ॲडव्होकेट यांची दरमहा मानधनावर पुढील आदेश होईपर्यत नियुक्ती बाबत निर्णय झाल्यास उमेदवारांच्या थेट पध्दतीने मुलाखतीसाठी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देवुन मा.निवड समिती मार्फत उमेवारांच्या मुलाखती घेवुन विहीत पध्दतीने कार्यवाही करणे बाबतच्या प्रस्तावास पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन मा.स्थायी समितीकडे निर्णयाकरीता पाठविणेसाठी मंजुरी करीता आदेशार्थ सविनय सादर./अ

येणेप्रमाणे सहा.आयुक्त, आस्थापना यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मु.ले.अ. व मु.ले.प. यांचा अभिप्राय घेण्यात यावा.

यावर मा.मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय की, "अ" आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा अभ्रिाय की, प्रस्तावीत "अ" प्रमाणे कार्यवाही करणेपुर्वी नव्याने विधीतज्ञ यांच्या आवश्यकतेबाबत कामगार अधिकारी / उपायुक्त (सा) यांचे अभिप्राय घेणेत यावे. नस्तीमध्ये पृष्ठ क्रमांक नमुद नाही काही मा. ॲड. यांचे प्रस्तावात नाव नाही परंतु सोबत ॲड यांचे अर्ज आहेत यांची खात्री करावी मनपात यापुर्वी ॲड पॅनलवर घेतले त्यांची मनपा विधीतज्ञ याची नियुक्ती बाबत मुळ नस्तीसह ठेवावे.

यावर कामगार अधिकारी यांचा अभिप्राय की, यापुर्वीच्या नियुक्त्या या आस्थापना विभागामार्फत आलेल्या असल्याने याबाबत आस्थापना विभागाने निर्णय घेणे उचित होईल.

यावर मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा अभ्रिाय की, विभागाने मुळ नस्ती केलेली दिसून येत नाही प्रस्तावात एकुण ११ विधीतज्ञांची मनपाच्या वतीने मा.न्यायालय दाव्या संदर्भात कामकाज पहाणे करीता नियुक्ती करण्यात आल्याचे दिसुन येते त्यामुळे नव्याने विधीतज्ञांचया नियुक्ती बाबत मा. कामगार अधिकारी यांचेकडील मनपातील एकुण न्यायालयातील दावे / प्रकरणांचा आढावा / अहवाल सादर केलेले दिसून येत नाही त्यामुळे पुन्हा नव्याने प्रस्तावीत ६ विधीतज्ञांची मनपा पॅनलवर नियुक्ती करणे आवश्यक असल्याचे कामगार अधिकारी व सहा. आयुक्त यांनी खात्री करूनच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४८१ मधील तरतुदीनुसार उचित निर्णय घ्यावा.

यावर मा.उपायुक्त (सा ) यांचा अभिप्राय की, कोर्ट विभागाने तपासुन स्वयंस्पष्ट अभिप्राय दयावा.

संदर्भ- १.ॲड. सुमित भरत भोज वगैरे सहा यांचे अर्ज

यावर कामगार अधिकारी तथा कोर्ट विभाग प्रमुख् यांचा अभिप्राय की, उपरोक्त विषयाबाबत विनंतीपुर्वक स्वयंस्पष्ट अहवाल कोर्ट विभागाकडून देण्यात येतो की, सद्यस्थितीत अहमदनगर महानगरपालिकेच्या पॅनलवर अहमदनगर येथील जिल्हा न्यायालयात अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने न्यायालयीन प्रकरणांचे कामकाज पहाणेकामी पुढीलप्रमाणे विधिज्ञ नेमण्यात आलेले आहेत.

ॲड. श्री.टी.ई.बाबर , २. ॲड.श्री.एम.व्ही. दिवाणे, ३. ॲड. श्री.एस.बी. रकटे, ४. ॲड. श्री.आर.डी. येनगंदुल , ५. ॲड. एन.व्ही. देशमुख , ६. ॲड.श्री.एस.एस. काकडे, ७. ॲड. श्री. आर.एम. पवार

वरीलप्रमाणे सात विधिज्ञ कामकाज पहात आहेत.

अहमदनगर महानगरपालिकेचे सद्यस्थितीत जिल्हा न्यायालयात नियमीत दावे, अपीले, टॅक्स अपीले, दरखास्ती असे एकुण ३८४ प्रकरणे प्रलंबित आहेत. सदर प्रकरणे कोणत्या वकीलांकडे आहेत, त्याची सद्यस्थिती व न्यायालय याबाबतचा तक्ता सोबत जोडला आहे.

वरीलप्रमाणे परिस्थिती पहाता आस्थापना विभागाचा मुळ अहवाल व मा.मुख्य लेखापरिक्षक यांचे अभिप्रायानुसार निर्णय घेणे उचित होईल तथापी आदेशार्थ अहवाल सादर असे. सोबत- तक्ता

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की, पॅनल वरील विधीज्ञांपैकी कोणत्या विधिज्ञांची कामकाज समाधानकारक नाही व कोणत्या विधीज्ञतांचे काम समाधनकारक आहे. यासह स्वयंस्पष्ट अभिप्राय सादर करावा.

यावर कामगार अधिकारी तथा कोर्ट विभाग प्रमुख् यांचा अभिप्राय की, फेरसादर मा.उपायुक्त यांचे आदेशानुसार व झालेल्या चर्चेनुसार अहमदनगर महानगरपालिकेचया पॅनल वरील विधिज्ञांच्या कामकाजाबाबत टक्केवारीचा गोषवारा पुढील प्रमाणे सादर असे.

| अ क्र | वकिलांचे नाव | निकाली प्रकरणांची संख्या | मनपाच्या बाजुने | मनपाच्या विरोधात | मनपाच्या बाजुने टक्केवारी | मनपाच्या विरोधात टक्केवारी | प्रलंबित प्रकरणांचा संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | टी.ई.बाबर | १०४ | ७८ | २६ | ७५ | २५ | ९१ |
| २ | एम.व्ही. दिवाणे | ९६ | ६० | ३६ | ६२.५ | ३७.५ | ८५ |
| ३ | शशिकांत बी. रकटे | ११० | ५३ | ५७ | ४८.१५ | ५१.८१ | ३४ |
| ४ | आर.डी. येनगंदुल | ६२ | ४० | २२ | ६४.५ | ३५.४८ | ३६ |
| ५ | निलेश देशमुख | ५७ | २६ | ३१ | ४५.६ | ५४.३८ | १२ |
| ६ | एस.एस. काकडे, | ४७ | १ | ४६ | २.१२ | ९७.८ | ८६ |
| ७ | राहुल पवार | ११६ | ७५ | ४१ | ६४.६५ | ३५.३४ | ४० |
| | **एकुण** | **५९२** | **३३३** | **५२९** | **५६.२५** | **४३.७५** | **३८४** |

सरगम रिटेलर्स यांचेकडून तत्कालीन जकात ठेकेदाराने जकातीची जास्तीची रक्कम वसुल केलेबाबत एकुण ८२ बीलांबाबत ८२ अपीलांबाबतचे कामकाज ॲड. श्री. सौरभ काकडे यांचेकडेस देण्यात आलेले आहे. सदर ८२ प्रकरणे एकाच प्रकारची परंतु वेगवेगळया बिलांबाबत असल्याने त्यांचे निकालही एकाच प्रकारचे होत असल्याने त्यांची टक्केवारी कमी दिसून येत आहे. येणेप्रमाणे फेरसादर असे.

यावर मा.उपायुक्त (सा.)यांचा अभिप्राय की, मनपा पॅनल वरील विधीज्ञांपैकी ज्या विधीज्ञांचे कामकाज समाधारक नाही म्हणजेच मनपाच्या बाजुने निकाल लागलेल्या दाव्यांची टक्केवारी ६०% पेक्षा कमी आहे. अशा विधीज्ञांची नेमणूक रद्द करून त्यांच्या जागेवर प्राप्त ६ विधीज्ञांच्या अर्जापैकी ज्या विधीज्ञांचा अनुभव जास्त आहे. त्यांची कमी करण्यात येणा-या असे एकुण ३ विधीज्ञांच्या जागेवर प्राप्त झालेल्या ६ विधीज्ञांपैकी अनुभवाचा आधारे ३ विधीज्ञांची नियुक्ती करण्याबाबत प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मात्र तसेच महापालिकेकरिता मा. हायकोर्टात एक Standing Counsel बद्दल विचार करणे गरजेचे आहे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- मा.न्यायालयामध्ये दाव्या संदर्भात कामकाज पहाणे करीता कायदेशीर सल्लागार (विधी तज्ञ) म्हणून ॲडव्होकेट याची दरमहा मानधनावर पॅनलवर नेमणुकी प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट चे सभागृहामध्ये वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- या विषयाची सविस्तर माहिती सांगा.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :- सात विधीतज्ञांनी मा.सभापती स्थायी समिती अहमदनगर महानगरपालिका यांचेकडे अर्ज देवुन अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने मा. जिल्हा न्यायालयामध्ये

कामकाज पहाणे करीता पॅनलशिप मानधनावर ॲडव्होकेट (विधीतज्ञ) कायदेशीयर म्हणून नियुक्ती होणेबाबत विनंती केलेली आहे. सदर अर्जावर मा.सभापती स्थायी समिती यांनी याबाबत सविस्तर प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर करणेबाबत निर्देशित केलेले आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- कोणते वकीलांकडे किती केसेस आहेत.या केसेस बद्दल माहिती सांगा.

मा.श्री.सुभाष लोंढे :- यांच्यावर कोणाचे नियंत्रण आहे.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :- कोर्ट विभागाकडून प्रत्येकास केसेस दिल्या जातात.

मा.श्री.गणेश भोसले :- विशीष्ठ वकिलांनाच केस दिल्या जातात.केस कोण देतात.सर्वांना समसमान केसेस दयायला पाहिजे.

कोर्ट विभाग श्री.देशमुख :- केस देतांना लेबर ऑफिसर केस वाटून देतात.

मा.श्री.सुभाष लोंढे :- पेंडीग केस किती आहे.

आस्थापना विभाग प्रमुख श्री. लहारे :- ऑफिस रिपोर्ट मधिल केसेस बाबतचा तक्त्याचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.सुभाष लोंढे :- पॅनल मधिल वकीलांना किती मानधन आहे.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :- मा.उच्च न्यायालयाच्या वकिलांना रू.२०,०००/- व ॲड.एस.के.पाटिल यांना रू.१७०००/- व जिल्हा व दिवानी न्यायालय यांचे काम पहाणा-या ७ वकिलांना प्रत्यकी रू.१०,०००/- दरमहा मानधन दिले जाते.

मा.श्री.कुमार वाकळे :- कोर्ट विभागावर कोणाचे नियंत्रण आहे.मुख्य विभाग प्रमुख कोण आहे.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :- या विभागाचे प्रमुख श्री कोंडा आहेत.आज ते रजेवर आहे.या विभागाकडील क्लार्क सभेमध्ये उपस्थीत आहेत.

मा.श्री.सुभाष लोंढे :- यापुर्वी कोण वकील होते.

आस्थापना प्रमुख श्री.लहारे :- ॲड.व्ही.एस.बेद्रे ,ॲड.किशोर लोखंडे , हे उच्च न्यायालयात काम पहातात. ॲड. एस.के.पाटील मा.औद्योगिक न्यायालय, मा.ॲड.श्री.मंगेश दिवाणे,ॲड.श्री तुळशीराम बाबर मा.ॲड.श्री. शशिकांत रकटे, मा.ॲड.श्री. राहुल पवार, मा.ॲड.श्री.सौरभ काकडे, मा.ॲड.श्री. आर.डी.येनगंदुल , मा.ॲड.श्री. निलेश देशमुख अहमदनगर न्यायालयात काम पहातात.

मा.श्री.कुमार वाकळे :- या पॅनल वरिल वकिल यांनी मा.महासभा व मा.स्थायी समिती सभेमध्ये उपस्थित राहणे बाबतचा ठराव करा जेणे करून सभेमध्ये कायदेशीर अडचणी आल्यास लगेच मार्गदर्शन घेता येईल.

मा.श्री.योगीराज गाडे :- प्रस्तावामध्ये नमुद केल्यानुसार महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियम १९४९ मधील ५३ नुसार विधीज्ञ नेमणुकीची कार्यवाही करण्यात आली आहेत का? यामध्ये वकिल मानधनावर कसे घ्यावे याची माहिती दिलेली आहे.जाहिरात दिली पाहिजे,नंतर इंटरव्हयू घेतले पाहिजे व त्यानंतर महानगरपालिकेच्या पॅनल वर मानधनावर नियुक्ती केली पाहिजे.नाहितर स्विकृत नगरसेवकांचे अर्ज ज्याप्रमाणे बाद झाले तसे हे अर्ज बाद होतील.या विषयास माझा विरोध आहे.

मा.सौ.सुवर्णा जाधव :- वकिलांच्या नियुक्तीस माझा विरोध आहे.

मा.श्री.सुभाष लोंढे :- श्री.लहारे साहेब,तुमच्याकडे किती अर्ज प्राप्त झाले आहेत.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :- सात अर्ज प्राप्त झाले आहेत.

मा.उपायुक्त श्री.पठारे :- महानगरपालिकेकडे सात अर्ज प्राप्त झाले.जाहिरात दिलेली नाही.डायरेक्ट अर्ज आल्यामुळे स्थायी समितीपुढे आलेले आहेत.

मा.सभापती साहेब :- सभेचा अजेंडा प्रसिध्द झाल्यापासुन आजपर्यंत माझ्याकडे २० अर्ज प्राप्त झाले आहे.या सर्व अर्जचा नियुक्ती बाबत विचार करावा लागेल.

मा.श्री.गणेश भोसले :- महानगरपालिकेच्या विधीज्ञ पॅनल वर मानधनावर वकिल घेतांना ५० टक्के महिलांना संधी दया.

मा.श्री.सुभाष लोंढे :- जाहिरात देवून,मुलाखती घेवून मगच वकिल नियुक्ती करा.अन्यथा या नियुक्तीस माझा विरोध आहे.

मा.सभापती साहेब :- पुर्वीच्या नेमणूका कशा केल्या आहेत.वकिल नियुक्तीस ज्या सदस्यांनी ठरावास विरोध केला आहे.त्या सदस्यांचा विरोध नोंदवून घेण्यात यावा.

आस्थापना प्रमुख श्री.लहारे :- ॲड.श्री.एस.के.पाटील यांची प्रशासकीय ठराव घेवून नियुक्ती केली आहे. व इतर ॲडव्होकेट यांची स्थायी समितीच्या ठरावाने नेमणुक केली आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- म्हणजे स्थायी समितीच्याच निर्णयाने नियुक्ती केली होती.

मा.श्री.कुमार वाकळे :- ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद असलेले सात अर्जदार व मा.सभापती साहेब यांच्या कडे प्राप्त झालेले वीस अर्ज असे एकुणे सत्तावीस अर्जादारांमधून वकीलांची नियुक्ती करण्यात यावी.

मा.श्री.गणेश भोसले :- रिपोर्ट पाहता वकील ठेवणे,कमी करणे अथवा नव्याने नियुक्ती करणे याचे सभापतींना अधिकार दया.

आस्थापना प्रमुख श्री.लहारे :- मा.आयुक्त तथा जिल्हाधीकारी साहेब यांनी महानगरपालिकेकरीता हायकोर्टात एक Standing Counsel बद्दल विचार करणे बाबत सुचित केले आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठ येथे एक Standing Counsel नेमणूकी बाबत मा.स्थायी समितीकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती करण्यात येईल.मा.सभापती स्थायी समिती यांना सर्व विधिज्ञ नियुक्तीचे अधिकार देण्यांत येत आहेत.

मा.सौ.आशा कराळे :- मा.सभापती स्थायी समिती यांना याबाबतचे अधिकार देण्यांत येत आहेत.

मा.सभापती साहेब :- वकिलांच्या नियुक्ती बाबत आपण जे चांगले व कार्यक्षम वकील असतील अशांच्या ॲडव्होकेट पॅनलवर नियुक्या करण्यात येतील. ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद असलेले सात अर्जदार व माझ्याकडे प्राप्त झालेले वीस अर्ज असे एकुणे सत्तावीस अर्जांमधून,मला प्राप्त अधिकारा नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या ॲडव्होकेट पॅनलवरील मा.दिवाणी व फौजदारी न्यायालय अहमदनगर, येथील काम पहाणारे मा.ॲड.श्री.मंगेश दिवाणे,ॲड.श्री तुळशीराम बाबर मा.ॲड.श्री. शशिकांत रकटे, मा.ॲड.श्री. राहुल पवार, मा.ॲड.श्री.सौरभ काकडे, मा.ॲड.श्री. आर.डी.येनगंदुल, मा.ॲड.श्री. निलेश देशमुख यांची मानद नियुक्ती संपुष्टात आणण्यास मान्यता देण्यात येत आहे. व ॲड. प्रसन्न एम.जोशी , ॲड.प्रसाद दिलीप गांगर्डे ,ॲड.महेश शरदराव काळे,ॲड.संजय मधुकर वालेकर, ॲड.रेणू राजेश कोठारी ,ॲड.सौ.शारदा सुरेश लगड,ॲड.बागवान तौसीफ मुश्ताक , ॲड.स्वाती एस.पाटील(वाघ), ॲड.अनुराधा दिनेश येवले, ॲड. केदारनाथ उत्तमराव राजेभोसले या वकीलांच्या नव्याने नियुक्त्याकरण्यात याव्यात.या नियुक्त्या पुर्वीच्या मानधनावर करण्यात याव्यात. तसेच मा उच्च न्यायालयाच्या खंडपीठ औरंगाबाद येथील कामकाजासाठी कार्यरत असलेले मानद विधीज्ञ ॲड.व्ही.एस.बेद्रे ,ॲड.किशोर लोखंडे , यांची मानद नियुक्ती कायम ठेवण्यात यावी. मा.औदयोगीक व कामगार न्यायालय येथील कामकाज पहाणारे विधिज्ञ ॲड. एस.के.पाटील यांची नियुक्ती कायम ठेवण्यात यावी.सदरचा विषय बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.तसेच मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठ येथे एक Standing Counsel नेमणूकी बाबत मा.स्थायी समितीकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती करण्यात येईल.

**<u>ठराव :-</u>** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार व स्थायी समितीच्या सभेमध्ये मा.सदस्यांच्या वतीने सभापतींना प्राप्त झालेल्या अधिकारा नुसारअहमदनगर महानगरपालिकेच्या मा.न्यायालयामध्ये दाव्या संदर्भात कामकाज पहाणे करीता ॲडव्होकेट पॅनलवरील कायदेशीर सल्लागार (विधीज्ञ) म्हणून ॲडव्होकेट यांची दरमहा माधनावर पॅनलवर नेमणूकी बाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावामधील सात अर्ज व माझ्याकडे प्राप्त झालेले वीस अर्ज असे एकुणे सत्तावीस अर्जांमधून सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

१) मा.दिवाणी व फौजदारी न्यायालय अहमदनगर, येथील काम पहाणारे विधीज्ञ यांची मानद नियुक्ती संपुष्टात आणण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) मा.दिवाणी व फौजदारी न्यायालय अहमदनगर,ॲडव्होकेट पॅनलवर ॲड. प्रसन्न एम.जोशी , ॲड.प्रसाद दिलीप गांगर्डे ,ॲड.महेश शरदराव काळे,ॲड.संजय मधुकर वालेकर, ॲड.रेणू राजेश कोठारी ,ॲड.सौ.शारदा सुरेश लगड,ॲड.बागवान तौसीफ मुश्ताक, ॲड.स्वाती एस.पाटील(वाघ), ॲड.अनुराधा दिनेश येवले, ॲड. केदारनाथ उत्तमराव राजेभोसले यांची यापुर्वीच्या मानधनानुसार (प्रती मानद विधीज्ञ रक्कम रु.१०,०००/- प्रमाणे) मानद विधीज्ञ म्हणुन नेमणूक करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

३) मा उच्च न्यायालयाच्या खंडपीठ औरंगाबाद येथील कामकाजासाठी कार्यरत असलेले मानद विधीज्ञ ॲड.व्ही.एस.बेद्रे ,ॲड.किशोर लोखंडे , यांची मानद नियुक्ती पुर्वीच्या मानधनावर कायम ठेवण्यात येत आहे. मा.औदयोगीक व कामगार न्यायालय येथील कामकाज पहाणारे विधिज्ञ ॲड. एस.के.पाटील यांची नियुक्ती पुर्वीच्या मानधनावर कायम ठेवण्यास मान्यता देण्यांत येत आहे.खर्च मंजूर.

४) मा.आयुक्त तथा जिल्हाधीकारी साहेब यांनी सुचित केल्या नुसार मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठ येथे एक Standing Counsel नेमणूकी बाबत मा.स्थायी समितीकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती बाबतची कार्यवाही करण्यात येईल.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.गणेश भोसले सही /-

अनुमोदक :- मा.श्री.आशा कराळे सही /-

ठराव बहुमताने मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका